# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

गेल्या दहा वर्षात देशाची सौर ऊर्जा उत्पादन क्षमता ३२ पट वाढली असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारत ऊर्जा सप्ताह २०२५ चं उद्घाटन आज पंतप्रधानांनी दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून केलं, त्यावेळी ते बोलत होते. जगातला प्रत्येक तज्ञ म्हणत आहे की २१ वं शतक भारताचं आहे, भारत केवळ स्वतःच्या विकासालाच नव्हे तर जगाच्या विकासालाही चालना देत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. मंत्रीस्तरीय अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सहभाग, प्रदर्शनाची जागा आणि आयोजित केली जाणारी सत्रे यांची संख्या पाहता हा जागतिक स्तरावरील दुसऱ्या क्रमांकाचा हा सर्वात मोठा ऊर्जा कार्यक्रम आहे. देशातली यशस्वी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना ही जागतिक स्तरावर स्वीकारार्ह आदर्श योजना म्हणून सादर केली जाईल. या सप्ताहात कॅनडा, जर्मनी, जपान, अमेरिका आणि इंग्लंड यांची दालने असतील.

****

भारतीय जनसंघाचे सहसंस्थापक, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना अभिवादन केलं जात आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी नवी दिल्लीतल्या भाजपा मुख्यालयात दीनदयाळ उपाध्याय यांच्या अर्धकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

****

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांचं आज छत्रपती संभाजीनगर इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथल्या महाविद्यालयात प्राध्यापक आणि नंतर परभणी इथल्या शिवाजी महाविद्यालयात प्राचार्य पदाची जबाबदारी सांभाळलेले बोराडे यांचा ‘पेरणी’ हा पहिला कथासंग्रह १९६२ साली पुण्याच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनाने प्रसिद्ध केला होता. त्यांची ‘पाचोळा’ ही कादंबरी विशेष गाजली. याशिवाय ‘तलफ’, ‘बुरूज’, यांसारख्या अत्यंत वेगळ्या धाटणीच्या कथाही त्यांनी लिहिल्या. ग्रामीण भागातल्या गरीब सर्वसामान्य माणसाला त्यांनी आपल्या कथांमधून जिवंत केलं. त्यांच्या कथांमधली पात्रं ठसठशीतपणे वाचकांच्या समोर येतात. त्यांच्या कादंबऱ्यांवरचे चित्रपटही प्रसिद्ध झाले आहेत.

पाचोळा या कादंबरीसाठी तसंच मळणी या कथासंग्रहासाठी महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आलं होतं. गेल्या आठवड्यात राज्य शासनाने विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ही बोराडे यांना जाहीर केला होता. बोराडे यांच्या पार्थिव देहावर आज संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बोराडे यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. बोराडे सरांच्या जाण्याने साहित्यातली शहरी आणि ग्रामीण भागाची नाळच तुटली आहे, अशा शब्दात शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

****

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. या परीक्षेसाठी १५ लाख पाच हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती मंडळानं दिली आहे.

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज देवगिरी महाविद्यालयातल्या परीक्षा केंद्रास भेट देऊन पाहणी केली.

****

प्रयागराज इथं सुरू असलेल्या कुंभमेळ्याला जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे १६ गाड्या चालवत असून, या सर्व स्थानकांवरची परिस्थिती सुरळीत आहे. यासंदर्भात कोणत्याही अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असं आवाहन मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी केलं आहे. राज्यातून दररोज सुमारे २० विशेष आणि नियमित गाड्या प्रयागराज आणि त्या भागासाठी चालवल्या जात आहेत.

पश्चिम रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक पंकज सिंह यांनीही नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवायचं आवाहन केलं आहे. भाविकांच्या समस्या सोडवण्यासाठी विविध रेल्वेस्थानकांवर मदत केंद्रंही स्थापन केल्याची माहिती त्यांनी दिली.

****

छत्तीसगड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकानं मुंबईतून तीन बांग्लादेशींना अटक केली. भारतात बेकायदेशीर वास्तव्य करून बनावट कागदपत्रांआधारे इराकला जाण्याचा त्यांचा विचार होता. मोहम्मद इस्माईल, शेख अकबर, शेख साजन अशी अटक केलेल्यांची नावं आहेत. मुंबई एटीएसच्या मदतीनं या तिघांनाही मुंबईच्या पायधोनी भागात अटक करण्यात आली आणि त्यांना रायपूरला परत नेण्यात आलं.

****

बुलढाणा जिल्ह्यात या वर्षीपासून लोणार पर्यटन महोत्सवाचा प्रारंभ करणार असल्याची घोषणा, राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केली. यासंदर्भातल्या बैठकीत ते काल बोलत होते. जगप्रसिद्ध लोणार सरोवराचे महत्त्व जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावं या उद्देशानं हा महोत्सव सुरू केला जाणार आहे.

****

बँकॉक इथं सुरू असलेल्या दिव्यांग तिरंदाजी आशिया चषक स्पर्धेत भारताच्या सरिता हिने महिलांच्या संयुक्त खुल्या प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली.

****